MHKO090003292020

**<u>स्पेशल दिवाणी दावा क्र. १८/२०२० मधील नि.क्र. ४२ खालील आदेश</u>**

1. वादीने नि. ३५ वर दिलेला कोर्ट कमिशनचा अर्ज नि. ५ चे निकालासोबत अथवा नि. ५ च्या अर्जाचे आधी निकाली करून नंतर नि. ५ चा अर्ज निकाली करणेत यावा याकरिता सदरचा अर्ज वादीने दिलेला आहे.
2. सदर अर्जाला प्रतिवादी यांनी नि. ४४ वर म्हणणे दिले आहे. सदर अर्जाला प्रतिवादींनी हरकत घेतली आहे. त्यांचे म्हणणे असे आहे की दि. ०१.१२.२०२० रोजी मे. न्यायालयाने नि. ५ खाली एकतर्फा आदेश करून अंतरिम तुर्तातुर्त ताकीद दिली आहे व हा अर्ज एक महिन्याच्या आत निकाली करणे आवश्यक आहे. वादीने हा अर्ज केवळ एकतर्फा आदेश पुढे चालू राहावा व पुरावा गोळा करण्यात याकरिता दिलेला आहे.
3. वादीतर्फे विद्यावंत वकील श्री. एम. व्ही. पाटील यांचा युक्तिवाद ऐकला. प्रतिवादींतर्फे विद्यावंत वकील श्री. एस. व्ही. पोवार यांचा युक्तिवाद ऐकला. मी या अनुमानास येते की वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये जो वाद चालू आहे तो वाद स्वतंत्ररित्या केवळ कब्जा या विषयी नसून तो दि. ०६.०१.२०१७ रोजी जे करारपत्र झाले आहे त्या करारपत्राच्या आधारे दाखल केलेला आहे. त्यामुळे सदर करारपत्राच्या अनुषंगाने या दाव्याचे पुढील कामकाज चालविण्याच्या दृष्टीने केवळ वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २६ नियम ९ प्रमाणे नि. ३५ वर जो अर्ज कमिशनचे नेमणुकीसाठी दिलेला आहे तो कोणत्याही प्रकारे दि. ०६.०१.२०१७ रोजीच्या करारपत्राशी प्रत्यक्ष संबंध येत नाही असे दिसून येते व त्यामुळे वादीने कमिशन अर्जामध्ये जी काही कथने केलेली आहेत व त्या अनुषंगाने जी मागणी केलेली आहे ती नि. ५ चे चौकशीकामी अथवा नि. ५ चे चौकशीपूर्वी गरजेची आहे असे दिसून

येत नाही. त्यामुळे मी या अनुमानास येते की वादीने नि. ३५ वर जो कमिशन नेमणुकीचा अर्ज दिलेला आहे तो नि. ५ चे चौकशीआधी अथवा नि. ५ चे चौकशीसोबत चालविणे योग्य होणार नाही. अंतिमरित्या मी या अनुमानास येते की वादीचा सदरचा अर्ज नामंजूर करणे जरूरी आहे. म्हणून खालीलप्रमाणे आदेश करते -

**आदेश**

अर्ज खर्चासह नामंजूर करणेत आला.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by
Yamini Dilip Boravke
Date: 2021.01.12
14:31:28 +0530

दिनांक – ०६.०१.२०२१

(यामिनी बोरावके)
दिवाणी न्यायाधीश व.स्तर,
गडहिंग्लज